Original. white.



(महाराष्ट्र शासनाने वर्षे १९८९ मध्ये स्थापिलेले)
(Established by Government of Maharashtra in the year 1989)

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

***Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik***

ज्ञानगंगा घरोघरी

## व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद संयुक्त बैठक

**Joint Meeting of the Board of Management and Academic Council**

## कार्यवृत्त

**Minutes of Meeting**

**बैठक क्रमांक** : 186
(Meeting Number)

**स्थळ** : **यश इन सभागृह**
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**Venue** : **Yash International Hall**
Yashwantrao Chavan Maharashtra Open, University, Nashik

**वार व दिनांक** : **बुधवार** , दिनांक 22 फेब्रुवारी 2023
**(Day and Date )** Wednesday, 22nd February 2023

**वेळ** : **सायंकाळी** 5.00 वाजता
**Time** : 5.00PM

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद यांची संयुक्त बैठक क्र.186 **सोम**वार दि. 22 फेब्रुवारी 2023 सायंकाळी 5.00 वाजता यश इन सभागृह, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 01. डॉ.पी.जी.पाटील, मा. कुलगुरू | | अध्यक्ष |
| 02. मा. डॉ. सत्यकाम, प्र कुलगुरू, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ , नवी दिल्ली | | सदस्य |
| 03. मा. संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई यांचे प्रतिनिधी | | सदस्य |
| 04. मा.श्री. विलास शिंदे, नाशिक | Online | सदस्य |
| 05. मा.डॉ.अनिल कुलकर्णी,पुणे | | सदस्य |
| 06. मा.डॉ.संजय चोरडिया, पुणे | Online | सदस्य |
| 07. संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा | | सदस्य |
| 08. संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | | सदस्य |
| 09. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा | | सदस्य |
| 10. संचालक, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | | सदस्य |
| 11. संचालक, कृषी विज्ञान विद्याशाखा | | सदस्य |
| 12. संचालक, संगणकशास्त्र विद्याशाखा | | सदस्य |
| 13. संचालक, विद्यार्थी सेवा विभाग | | सदस्य |
| 14. संचालक, मूल्यमापन विभाग | | सदस्य |
| 15. उपग्रंथपाल, ग्रंथपाल व माहितीस्त्रोत केंद्र | | सदस्य |
| 16. संचालक, अंतर्गत गुणवत्ता व आश्वासन कक्ष | | सदस्य |

**खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.**

| | |
|---|---|
| 17. मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण, मुंबई | सदस्य |
| 18. मा. सचिव, उद्योग, मुंबई | सदस्य |
| 19. मा. सचिव, कृषी, मुंबई | सदस्य |
| 20. मा. प्रा. महेंद्र लामा | सदस्य |
| 21. मा. आ. सुहास कांदे | सदस्य |
| 22. मा. आ. श्रीमती सरोज अहिरे | सदस्य |
| 23. मा. श्री. उदीत सेठ | सदस्य |
| 24. मा, संचालक, उच्च शिक्षण, पुणे | सदस्य |
| 25. संचालक, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण मुंबई | सदस्य |
| 26. प्रा. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर | सदस्य |
| 27. डॉ.जयदीप निकम, संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा | सदस्य |
| 28. डॉ. प्रमोद बियाणी, संचालक, शैक्षणिक सेवा विभाग | सदस्य |

| ठराव | ठराव क्र. | तपशील |
| --- | --- | --- |
| 186.1.0 | 186.1.1 | **स्वागत** (Welcome) |
| 186.2.0 | 186.2.1 | **प्रस्तुत विद्यापीठाच्या मा. कुलगुरू यांच्या निवडीसाठी स्थापन करण्यात येणाऱ्या शोध-निवड समितीवर मा. कुलगुरू यांनी प्रो. डॉ. अनुपम शुक्ला, संचालक, सरदार वल्लभभाई नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सुरत यांच्या केलेल्या नामनिर्देशनास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत....**<br><br>**टिपणी** – प्रा. ई. वायुनंदन, कुलगुरू यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांचा दि. 7 मार्च् 2022 रोजी कुलगुरू पदाचा कार्यकाल संपुष्टात आला आहे. या संदर्भात मा. राज्यपाल राजभवन, मुंबई यांचे प्रधान सचिव यांचेकडून 14 सप्टेंबर 2021 रोजी नवीन कुलगुरू निवड प्रक्रिया सुरू करण्यासंदर्भात पत्र प्राप्त झाले.<br><br>यापत्राच्या आधारे, व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद यांची संयुक्त बैठक 03.12.2021 रोजी आयोजित करण्यात आली होती. त्यानुसार, निवड व शोध समितीसाठी सदस्याचे नाव पत्र क्रमांक YCMOU/VC/849, दिनांक 13/12/2021 द्वारे आणि त्यानंतर पुन्हा क्र. YCMOU/VC/2022/889, 09/08/2022 द्वारे मा. राज्यपाल राजभवन मुंबई यांना प्रो. डॉ. अनुपम शुक्ला, संचालक, सरदार वल्लभभाई नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सुरत यांचे नाव कळविण्यात आले होते.<br><br>प्रसिद्ध झालेल्या जाहिरातीनुसार कुलगुरू निवडीची प्रक्रिया सुरू करण्यात आली. जाहिरातीला प्रतिसाद म्हणून प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी शोध समितीकडून छाननी केलेल्या उमेदवारांना दि.26 आणि 27 नोव्हेंबर 2022 रोजी मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या शोध समितीच्या बैठकीसमोर बोलावण्यात आलेले होते.<br><br>तथापि, प्रधान सचिव, राजभवन, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या पत्र क्र. RB/YCMOU-2021/CR-265/Edn.2/1460-C) अन्वये दि. 30 डिसेंबर 2022 रोजी यापूर्वीची शोध समिती विसर्जित करण्यात आली.<br><br>यासंदर्भात प्रधान सचिव राजभवन, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्र क्र. RB/YCMOU-2023/CR-347/Edn.2/47 दिनांक 11 जानेवारी 2023 अन्वये नवीन कुलगुरूंच्या निवडीसाठी शोध-निवड समितीच्या एका सदस्याचे नामनिर्देशन करणेबाबत कळविले होते. त्याकरिता दि. 16 फेब्रुवारी 2023 रोजी व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीची सूचना सर्व सन्माननीय सदस्यांना पाठविण्यात आली होती.<br><br>तदनंतर दि. 23 जानेवारी 2023 रोजी राजभवन, मुंबई कडून प्राप्त झालेल्या सूचनांनुसार, 03/12/2021 रोजी झालेल्या व्यवस्थापन मंडळ आणि विद्वत परिषदेच्या संयुक्त बैठकीत विद्यापीठाने प्रो.डॉ. अनुपम शुक्ला यांच्या नावाची शिफारस केली होती. तेच नाव कळवून त्यास आगामी व्यवस्थापन मंडल व विद्वत परिषद यांच्या संयुक्त बैठकीमध्ये कार्योत्तर मान्यता घ्यावी असे सूचविले होते.<br><br>त्यानुसार विद्यापीठ कायदा, 1989 नुसार कलम 10 (3) अन्वये कुलगुरूंना प्रदान केलेल्या अधिकारांनुसार, व्यवस्थापन मंडळ आणि विद्वत परिषद या संयुक्त बैठकीचे अध्यक्ष म्हणून मा. कुलगुरू यांनी प्रा.डॉ. अनुपम शुक्ला, संचालक, सरदार वल्लभभाई नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सुरत यांचेच नाव कळविण्याचा निर्णय घेतला असून तो, प्रधान सचिव, राजभवन, मुंबई |

यांचेकडे पत्र क्रमांक YCMOU/VC/916, दिनांक 23 जानेवारी, 2023 द्वारे कळविला आहे त्यानुसार सदरचा विषय हा कार्योत्तर मान्यतेसाठी दि. 22 फेब्रुवारी 2023 रोजी होणाऱ्या व्यवस्थापन मंडळ आणि विद्वत परिषद या संयुक्त बैठकीपुढे सादर...

**व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद ठराव** - प्रस्तुत विद्यापीठाच्या मा. कुलगुरू यांच्या निवडीसाठी स्थापन करण्यात येणाऱ्या शोध निवड समितीवर मा. कुलगुरू यांनी प्रो.डॉ. अनुपम शुक्ला, संचालक, सरदार वल्लभभाई नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सुरत यांच्या केलेल्या नामनिर्देशनास व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद यांच्या संयुक्त बैठकीत सर्वानुमते कार्योत्तर मान्यता देण्यात आली.

186.2.2 **विद्यापीठाच्या अठ्ठाविसाव्या दीक्षान्त समारंभात प्रदान करण्यात येणाऱ्या पदव्या व पदविकांना मान्यता मिळणेबाबत.....**

**टिपणी** : विद्यापीठाचा 28 वा दीक्षान्त समारंभ, दि.23 फेब्रुवारी 2023 रोजी सकाळी 10 वाजता आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमात विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांच्या ऑक्टोबर 2021 व मे 2022 या वर्षातील पात्र विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे पदव्या व पदविका, पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदव्या, एम.फिल व संशोधन पदव्यांचा समावेश आहे.

| Type of Degree/ Diploma | Year 2021 & 2022 |
|---|---|
| Degree | 1,14,328 |
| Diploma | 24,518 |
| PG Degree | 16,369 |
| M.Phil | 02 |
| PG Diploma | 12 |
| Ph,D | 05 |
| Grand Total | 1,55,234 |
| (सन ऑक्टोबर 2021 + मे 2022) | |

विविध शिक्षणक्रमांच्या सन ऑक्टोबर 2021 व मे 2022 या दोन वर्षातील विद्यार्थ्यांना एकूण 1,55,234 पदव्या ,पदविका, पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदव्या, एम.फिल, पीएच.डी. पदव्या प्रदान करण्यात येणार आहेत. त्यात 1,14,328 पदव्या, 24,518 पदविका, 16369 पदव्युत्तर पदव्या, 12 पदव्युत्तर पदविका, 2 एम.फिल व 5 पी.एच.डी. पदव्यांचा समावेश करण्यात आला आहे.

**व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद ठराव** – 28 व्या दिक्षांत समारंभात, विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांच्या विद्यार्थ्यांना ऑक्टोबर 2021 व मे 2022 या दोन वर्षातील पात्र विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे देण्यात येणाऱ्या एकूण 1,55,234 पदव्या पदविका, पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदव्या, एम.फिल, पीएच.डी. पदव्या प्रदान करण्यात येणार आहेत. त्यात 1,14,328 पदव्या, 24,518 पदविका, 16369 पदव्युत्तर पदव्या, 12 पदव्युत्तर पदविका, 2 एम.फिल व 5 पी.एच.डी पदवी प्रदान करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**मा. अध्यक्षांच्या व उपस्थितीत सन्माननीय सदस्यांच्या परवानगीने ऐनवेळचा विषय**

186.3.1 **विद्यापीठाच्या परीक्षा आयोजन आणि निकालबाबत अभिनंदनाचा ठराव...**

(**टिपणी** – माहे जून 2022 व जानेवारी 2023 मध्ये विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमाच्या परीक्षा आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर परीक्षेचे आयोजन उत्तम रित्या झाले. निकालदेखील विहित वेळेत बिनचुक जाहीर करण्यात आले. त्यामुळे परीक्षा विभाग व विभागीय केंद्रातील सर्व सहकारी यांचा अभिनंदनाचा ठराव करावा असे मा.डॉ.अनिल कुलकर्णी, सदस्य व्यवस्थापन मंडळ यांनी प्रस्ताव मांडला.)

**व्यवस्थापन मंडळ आणि विद्वत परिषद ठराव** – मा.डॉ.अनिल कुलकर्णी यांनी मांडलेल्या प्रस्तावावर संयुक्त बैठकीत चर्चा होऊन परीक्षा विभाग व विभागीय केंद्र व परीक्षा आयोजनासंदर्भातील सर्व सहकारी व घटकांचे अभिनंदन करण्याच्या ठरावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| | | **मा. अध्यक्षांच्या परवानगीने मा.व्यवस्थापन मंडळ यांना ऐनवेळचा विषय** |
| | 186.4.1 | **नियोजन मंडळ सभा क्र. 43 ठराव क्रमांक 43.5.1 दिनांक 16.02.2023 नुसार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे आटपाडी, जि. सांगली येथे विद्यापीठाचे उपकेंद्र स्थापन करणेबाबत केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीमध्ये विचारार्थ व मान्यतेस्तव सादर...**<br><br>[**टिपणी** – महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य मा. श्री. गोपीचंद पडळकर यांनी आटपाडी जि. सांगली येथे विद्यापीठाचे उपकेंद्र स्थापन करण्यासंदर्भात संचालक, विद्यार्थी सेवा विभाग यांनी सादर केलेला प्रस्ताव नियोजन मंडळाच्या दि. 16/2/2023 च्या बैठकीस मा. अध्यक्षांनी ऐनवेळी सादर करण्याचे निर्देश दिले. त्या अनुषंगाने सदरचा विषय नियोजन मंडळापुढे चर्चेसाठी ठेवण्यात आला. सर्व सदस्यांसमवेत चर्चा झाल्यानंतर सदरचा विषय नियोजन मंडळाने शिफारस करून व्यवस्थापन मंडळापुढे सादर करावा असे सुचविण्यात आले. ]<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे आटपाडी, जि. सांगली येथे विद्यापीठाचे उपकेंद्र स्थापन करणेबाबत नियोजन मंडळाचा ठराव क्र. 43.5.1 दिनांक 16.02.2023 अन्वये केलेली शिफारस सर्वानुमते मान्य करण्यात आली. |

मा.कुलगुरू तथा अध्यक्ष व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद यांच्या परवानगीने बैठक संपन्न झाल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सचिव**
**व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद**

**अध्यक्ष**
**व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद**